# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**
**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १९६, रूपये:- ९५,१५,००,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (१) | ६०१९ | १० | जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुका येथील ३० खाटावरून १०० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन करण्यासंदर्भात शासनाकडे सातत्याने मागणी करुन तो प्रस्ताव प्रधान सचिव यांच्याकडे मागील दोन वर्षापासून प्रलंबित असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम दुर्लक्ष, नागरिकांना होत असलेली गैरसोयीबद्दल व योग्य सेवा मिळत नसणेयाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (२) | ६०८८ | १० | पुरंदर ( जि. पुणे ) तालुक्याच्या आरोग्य विभागातील विविध रिक्त पदे असून पुरंदर तालुक्यातील बराचसा भाग हा दुर्गम व डोंगरी असून याभागातील गरोदर महिला, जेष्ठ नागरीक व मुलांना आरोग्य सुविधेसाठी शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र व ग्रामीण रूग्णालयावर अवलंबून रहावे लागत असणे, परंतु पुरंदर तालुक्यातील 5 प्राथमिक व 37 आरोग्य उपकेंद्रांतील एकुण 19 तांत्रिक पदे(वैद्यकीय अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सहाय्यक पुरूष व स्त्री, औषध निर्माता, आरोग्य सेवक व सेविका) व 22 अतांत्रिक पदे(कनिष्ठ सहाय्यक, परिचर, वाहनचालक) अशी एकुण 41 पदे रिक्त असल्याने वारंवार हवामानातील बदलामुळे फैलावणारे साथीचे आजार व अपुऱ्या मनुष्यबळामुळे परिसरातील नागरीकांना मन:स्थाप सहन करावा लागत आहे. तसेच रिक्त पदामुळे रूग्णांना सेवा सुविधा पुरविताना अपुऱ्या रिक्त आस्थापणेवरील पदे न भरल्याने कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा ताण व गोरगरीब रूग्णांना आरोग्य सुविधा वेळेवर न मिळाल्याने रोषाला सामोरे जावे लागत असल्याने पुरंदर तालुक्यातील हवामानातील बदलामुळे वारंवार फैलावणारे साथीच्या आजार व अपुऱ्या आरोग्य सेवा याबाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करता प्राथमिक, आरोग्य उपकेंद्र व ग्रामिण रूग्णालयातील रिक्त पदांची भरती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३) | ५९८८ | १० | मुंबई उपनगरात मालाड पश्चिम जनकल्याण नगर भूमी पार्क येथे सामान्य रुग्णालय असून दुसरे रुग्णालय नसणे, सामान्य रुग्णालय मालवणी या रुग्णालयात अंबोजवाडी आक्सा गाव गणेश नगर मालवणी भाब्रेकर नगर जनकल्याण नगर खारोडी गाव व एरंगल गाव येथील रुग्ण मोठ्या प्रमाणावर येत असणे, या रुग्णालयात बाह्य व अंतर रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर असणे रुग्णालयात रुग्ण मोठ्या प्रमाणावर येत असल्याने सदरच्या रुग्णालयाचे श्रेणी वर्धन 60 खटांवरून तीनशे घाटांचे रुग्णालय करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे रुग्णालयात अतिदक्षता विभाग नवजात शिशुविभाग विशेष कक्ष व आयुष सुविधा कार्डिया उपचार केंद्र सुरू करणे विशेष सेवा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता भासत असणे या सोयी सुविधा देण्यासाठी व रुग्णालयाचा विस्तार करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे रुग्णालयाचा विस्तार करण्यासाठी त्या ठिकाणी जागा उपलब्ध असून त्या ठिकाणी अतिदक्षता विभाग नवजात शिशुविभाग विशेष कक्ष व आयुष सुविधा कार्डिया उपचार केंद्रसाठी साधण सामुग्री खरेदी करणे उपरोक्त बाबी संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी माननीय मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री तसेच आयुक्त, आरोग्य विभाग व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभागाकडे निवेदनाद्वारे वारंवार मागणी केली असणे तथापि याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांनी निर्माण झालेला हा तीव्र संतोष व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना शासनाने रुग्णालयाचे श्रेणी वर्तन करून 300 काटांचे रुग्णालय करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १९७, रूपये:- २,१०,०१,००,०००/-** |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (४) | ६०१२ | १०० | राज्यात ७०० ठिकाणी हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना स्थापन करण्यासाठी शासनाने निधी ची तरतूद केली असणे, मात्र डहाणू विधानसभा मतदार संघातील डहाणू व तलासरी येथील NRHM मधील दवाखाने तसेच डहाणू विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावात हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना स्थापन करण्यात यावे, त्यासाठी पुरेसा निधी द्यावा, तसेच NRHM अंतर्गत करण्यात आलेली कामे अत्यंत निकृष दर्जाची असल्याने या सर्व कामांची चौकशी करून अहवाल सादर करण्याची आवशकता असणे, यावर शासने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २०३, रूपये:- २,०७,७७,०२,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (५) | ६०७५ | १० | बुलढाणा जिल्ह्यातील स्वयं सेविका गट प्रवर्तक दहा जुलै 2023 रोजी मागणी दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या समोर निषेध आंदोलन केलेले असणे, त्यामध्ये जानेवारी 2023 पासून अशा गटप्रवर्तकांना राज्य शासनाकडून मिळणारे वाढीव मानधन गेल्या सहा महिन्यापासून मिळालेले नसणे, जानेवारी ते मार्च पर्यंत राज्य शासनाकडून निधीची तरतूद असताना देखील बुलढाणा जिल्ह्यातील आशा सेविकांना व गतप्रवर्तकांना मानधन वाढीपासून वंचित ठेवलेले असणे, बुलढाणा जिल्ह्यातील आशा वर्कर्सला त्यांनी केलेल्या कामाचा मोबदल्यात मिळणाऱ्या पेमेंट शीट कुठेच दिल्या जात नसल्यामुळे अनेक अशा वर्कर्सना कामाचा पूर्ण मोबदला मिळतो किंवा नाही याबाबत त्यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झालेला असणे, एकीकडे प्रचंड महागाई वाढत असताना गेल्या पाच वर्षात पोषण आहाराच्या व इंधनाच्या आहारात शासनाने कुठलीही वाढ केलेली नसणे, डिजिटल कारभाराच्या नावाखाली पोषण ट्रॅक्टर नावाचा एक सदोष ॲप सेविकांच्या माथी मारलेला असणे, ॲपसी सुसंगत मोबाईल शासनाने दिलेला नसणे, सर्वोच्च न्यायालयाने सव्वा वर्षांपूर्वी ग्रॅज्युएटी बाबत सकारात्मक निकाल देऊनही त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासन उदासीन असणे, शासनाच्या अनास्थ्येमुळे अंगणवाडी कर्मचारी व अशा गटप्रवर्तक संतप्त झालेले असणे, या सर्व मागण्यांच्या संदर्भात आशा सेविका, गटप्रवर्तन यांनी जिल्हा परिषदेसमोर निषेध व्यक्त केलेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २०४, रूपये:- १९,८६,८८,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (६) | ६०७४ | १० | भंडारा जिल्हयातील साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ईमारती जिर्ण अवस्थेत असणे, तालुका स्तरावरील उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलेसिस युनिट उपलब्ध नसणे, लाखनी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पोहरा येथील ईमारत जिर्ण अवस्थेत असल्यामुळे तेथील रुग्णांची गैरसोय होत असणे, त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना उपचाराकरिता शहरी भागामध्ये ये-जा करण्याकरीता मोठया प्रमाणात निर्माण होणे, प्राथमिक आरोग्य केंद्रात अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध नसणे, त्यामुळे सुविधाच्या अभावामुळे रोगाचा प्रसार होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (७) | ६०७० | १० | मौ.सिरसम (पा.)ता.पालम जि.परभणी या ठिकाणी आरोगय सेवा उपलब्ध नसणे, आरोग्य उपकेंद्र मिळण्यासंबंधिचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, आरोग्य उपकेंद्राच्या स्थापना करुन त्याठिकाणी सार्वजनिक आरोग्य प्रयोग शाळेची स्थापना करण्याची आवश्यकता असणे, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांच्याकडे प्रलंबित असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.४.११.२०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा आरोगय अधिकारी यांच्याकडे मागणी केली असणे, गत २५ वर्षापासून मागणी असणे, सन २००२ च्या आराखडयात नाव असणे, मात्र शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र अंसतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २४ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई